| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |

**प्रेसनोट क्रमांक :- ९९-२२** **दिनांक :- ०८/०४/२०२२**

## रमाबाई क्लिनिक मधील बोगस डॉक्टरवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेची कारवाई.

आचोळे पोलीस ठाण्याचे हद्दीत रमाबाई क्लिनिक, बी विंग, ग्राऊंड फलोअर-रुम नं ४ अक्षर भुवन, विजय विहार कॉम्पलेक्स, एव्हरशाईन सिटी वसई पुर्व येथे शुभांगी वंगारी नावाची महीला ही कोणतीही वैदयकीय पात्रता नसताना रमाबाई क्लिनिक चालिवत असल्याबाबतची माहीती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, वसई यांना मिळाली. सदर डॉक्टर यांची खातरजमा करणेकरीता व कारवाई करीता डॉ. कुश बंशनारायण मिश्रा वय ३४ वर्षे. वैद्यकीय अधिकारी, एव्हरशाईन क्षेत्र वसई ता वसई पालघर यांना व दोन पंच, डमी पेशंट यांना बोलावुन घेतले. त्यानंतर पोनि चौधरी, पोहवा /०६१६८ कांबळे, पोहवा/०७०५५ महेंद्र शेटये, पोहवा/०५०२८ किणी, पोहवा/१०००२ शिंदे, मपोशि/१६०९५ काजल प्रदिप पाटील, चालक पोना/०७०६६ सुनिल विष्णु पागी, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा असे डॉ. गणेश आर. वंगारी रमाबाई क्लिनिक, विजय विहार कॉम्पलेक्स एव्हरशाईन सिटी वसई पुर्व येथे जावुन तेथे डमी पेशंट पाठवुन पंच यांच्यासह क्लिनिकमध्ये जावुन खात्री केली असता शुभांगी गणेश वंगारी वय ४० वर्षे रा. ट्रिनिटी प्राईड, रुम नं १०३, एव्हरशाईन, कार्निवल थिएटर जवळ वसई पुर्व ता. वसई जि. पालघर यांचेकडे कोणतीही वैदयकीय प्रमाणपत्र नसताना, फसवणुक करण्याच्या उदद्ेशाने रुग्णांची व महाराष्ट्र शासणाची फसवणुक करीत असताना मिळुन आल्याने दिनांक ०६/४/२०२२ रोजी ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे. सदरबाबत आरोपींविरुध्द भादंविसं कलम ४२० सह महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीस अधिनियम १९६१ चे कलम ३३, ३६ प्रमाणे डॉ. कुश बंशनारायण मिश्रा वय ३४ वर्षे. वैद्यकीय अधिकारी, एव्हरशाईन क्षेत्र वसई ता वसई पालघर यांनी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा वसई युनिटचे पोनि/संतोष चौधरी व पोलीस स्टाफ यांनी केली.